# श्रीनिवास 'एमएमआरसीएल'चे व्यवस्थापकीय संचालक

म. टा. प्रतिनिधी, मुंबई



मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या (एमएमआरसीएल) व्यवस्थापकीय संचालकपदी 'एमएमआरडीए'चे महानगर आयुक्त एस. व्ही. आर. श्रीनिवास यांची नियुक्ती करण्यात आली. रणजितसिंह देओल यांच्या बदलीनंतर श्रीनिवास यांच्याकडे या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.

मेट्रो-३च्या कारशेडचा प्रश्न प्रलंबित आहे. कारशेडची जागा अद्याप निश्चित झालेली नाही. आरे येथे कारशेडचे काम करण्यात येत असल्याचा आरोप करत पर्यावरणवाद्यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. तसेच आरेमध्ये दर रविवारी आंदोलनाला सुरुवात केली होती. त्यामुळे कारशेडच्या प्रश्नावरून पुन्हा वादंग निर्माण होण्याची चिन्हे निर्माण झाली होती. दरम्यान, 'एमएमआरडीए'कडे या मेट्रो मार्गिकेच्या कारशेडसाठी जागा निश्चित करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यामुळे श्रीनिवास यांच्या नियुक्तीनंतर कारशेडच्या जागानिश्चिती प्रक्रियेला गती मिळण्याची चिन्हे आहेत.